# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक १९/०९/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

**चोरी**

**१) पो.स्टे. भिवापुर**:– अंतर्गत २५ कि.मी अंतरावर आठवडी बाजार नांद येथे दिनांक १८/०९/२२ चे १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मधुकर चिरकुटराव दांडेकर वय ६३ वर्षे, रा. वार्ड क्र. ०५ नांद ता. भिवापुर हे आठवडी बाजार करण्याकरीता नांद येथे गेले. ते भजीपाला घेते वेळी त्यांच्या खिश्यातुन पैसे काढण्याचा त्यांनाा भास झाल्याने त्यांनी मागे वळुन पाहिले तर दाडीवाला एक पांढरा शर्ट घातलेला माणुस दिसला. फिर्यादींना त्याला बोलायची हिम्मत न झाल्याने त्यांनी फोन करून सरपंच तुळशिदास चुटे यांना फोन करून बोलाविले ते येई पर्यंत फिर्यादींनी त्याचे वर नजर ठेवली. तेवढयात त्या माणसा सोबत एक माणुस आला व दोन्ही सोबत सोबत होते. सरपंच आल्या बरोबर दोघांनी त्यांना पकडुन नांद चौकी येथे आणले. पोलीसांनी त्यांची विचारपुस करून आरोपी क्र. १) विकास बारी भोडमाके वय ४० वर्षे रा. कवडापुर बेला याची अंगझडती मध्ये ४,०००/–रू. व आरोपी क्र. २) चरणदास ज्ञानेश्वर सयाम, वय ३० वर्षे, रा. कवडापुर बेला याच्या जवळ ७,३४०/–रू. मिळाले. आरोपीतांनी फिर्यादी चे खिश्यातुन ५०० चे ७ नोटा एकुण ३,५००/–रू. चा मुद्देमाल चोरले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३८०, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि प्रकाश चनगोले मो.क्र. ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावर वार्ड नं १ चिचोली आठवडी बाजार येथे दिनांक १८/०९/२२ चे १८.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– १) दिलीप रामदास गजभिये वय ४८ वर्ष, रा. वार्ड नं १ चिचोली हे चिचोली आठवडी बाजार येथे भाजी घेण्याकरीता गेले असता आपले टिशर्टचे वरील खिश्यामध्ये १ प्लस नार्ड २ चा मोबाईल फोन किंमत ३१,०००/–रु. चा ठेवला असता एक अज्ञात आरोपीने फिर्यादीचे खिश्यातील वरील कंपनीचा मोबाईल चोरुन पळुन गेला. तसेच ईतर दुसरा ईसम नामे– मनोज मंडलीक यांचा विवो कंपनीचा मॉडल नं वाय १९ मोबाईल फोन किंमत ८,०००/–रु. शर्टचे वरील खिश्यामध्ये ठेवला होता. तो सुध्दा अज्ञात आरोपीने चोरुन नेले. अज्ञात आरोपीने एकुण २ मोबाईल किंमती ३९,०००/–रु. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उमेश ठाकरे मो.नं. ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर